**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र दिन विविध कार्यक्रमांनी साजरा, महाराष्ट्रात राहणाऱ्यांनी मराठी शिकलीच पाहिजे, अशी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची भूमिका

- मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते मुंबई पुणे-द्रुतगती मार्गावरच्या मिसिंग लिंक प्रकल्पाचं उद्घाटन

- काँग्रेस नेते पवन खेरा यांना सर्वोच्च न्यायालयाकडून अटकपूर्व जामीन मंजूर

- व्यावसायिक वापराचा एलपीजी सिलिंडर ९९३ रुपयांनी महाग, मुंबईत १९ किलो सिलिंडरची किंमत ३ हजाराच्या वर

**आणि**

- पुढच्या महिन्यात हिमालय पायथा, पूर्व किनारपट्टी, तसंच महाराष्ट्र आणि गुजरातच्या काही भागात उष्णतेची तीव्र लाट राहण्याची शक्यता

**<><><><><>**

महाराष्ट्राचा ६७ वा स्थापना दिन आज राज्यभर विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. या निमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची पवित्र भूमी देशभक्ती, साहस आणि आत्मसन्मानाची प्रेरणा देते, असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. तर महाराष्ट्र हे उच्च सांस्कृतिक परंपरा, सामाजिक सुधारणा, आणि सर्वांगीण प्रगतीचं प्रतीक असल्याचं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे. महाराष्ट्रानं साहित्य, नाट्य, संगीत, चित्रपट, तसंच उद्योग, शिक्षण, विज्ञान आणि समाजसेवेत प्रगतीचे नवे मानदंड प्रस्थापित केले असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

महाराष्ट्र दिनानिमीत्त मुंबईत शिवाजी पार्क मैदानावर झालेल्या मुख्य शासकीय सोहळ्यात राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. त्यानंतर राज्य पोलीस तसंच इतर पथकांच्या संचलनाची मानवंदना राज्यपालांनी स्वीकारली. त्यांनी आपल्या भाषणाची सुरुवात मराठीतून केली. आणि महाराष्ट्रानं विविध क्षेत्रात केलेल्या कामगिरीचा आढावा घेतला.

मुंबईत संयुक्त महाराष्ट्र लढ्यात बलिदान देणाऱ्यांच्या हुतात्म्यांच्या स्मारकावर मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आदरांजली वाहिली. महाराष्ट्रात राहणाऱ्यांनी मराठी शिकलीच पाहिजे, मात्र मराठी न येण्यावरुन हिंसा कधीही खपवून घेतली जाणार नाही, असं ते यावेळी म्हणाले.

**- - होल्ड - बाईट - मुख्यमंत्री - - -**

**<><><><><>**

राज्याच्या स्थापना दिनाचं औचित्य साधून, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबई पुणे-द्रुतगती मार्गावरच्या १३ किलोमीटर आणि तीनशे मीटर लांबीच्या मिसिंग लिंक प्रकल्पाचं उद्घाटन केलं. या नवीन मार्गामुळं मुंबई आणि पुण्यादरम्यानच्या प्रवासाचं अंतर ६ किलोमीटरनं कमी होईल, त्यामुळे प्रवासाच्या वेळेत साधारण २० ते ३० मिनिटांची बचत होणार आहे.

सुरुवातीच्या टप्प्यात या मार्गावर हलक्या वाहनांना प्रवासाची मुभा असेल, त्यानंतरच्या टप्प्यात बससाठी मुभा दिली जाणार आहे. अवजड वाहनांना मात्र जुनेच मार्ग वापरावे लागणार आहेत. या मार्गावर जगातला सर्वात रुंद २२ मीटर पेक्षा जास्त रुंदीचा बोगदा तयार केला असून त्याची नोंद गिनेज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सनं घेतली असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी नंतर वार्ताहर परिषदेत दिली.

सलग आलेल्या सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर आज पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती.

**<><><><><>**

महाराष्ट्रात राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलेल्या स्व-गणनेनं राज्यातल्या यंदाच्या जनगणनेच्या प्रक्रियेचा आज औपचारिक प्रारंभ झाला. ही स्व-गणना येत्या १५ मे पर्यंत चालणार असून त्यानंतर जनगणना कर्मचारी घरोघरी जाणार आहेत.

**<><><><>**

सर्वोच्च न्यायालयानं काँग्रेस नेते पवन खेरा यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. आसामचे मुख्यमंत्री हिंमता बिस्वा सर्मा यांच्या पत्नीकडे एकापेक्षा अधिक पासपोर्ट असल्याचा आणि परदेशात त्यांची संपत्ती असल्याचा आरोप खेरा यांनी केला होता. याप्रकरणी तपासात सहकार्य करण्याचं आणि चौकशीसाठी पोलिस ठाण्यात हजर राहण्याचे आदेशही न्यायालयानं खेरा यांना दिले आहेत.

**<><><><>**

जागतिक बाजारात साखरेच्या दरांमधल्या घसरणीमुळे २०२५-२६ च्या हंगामात भारताची साखर निर्यात केवळ साडेसात ते आठ लाख टनांपर्यंत राहण्याची शक्यता असल्याचं सरकारी सूत्रांनी सांगितलं आहे.

**<><><><>**

यंदाच्या इफ्फी चित्रपट महोत्सवासाठी संचालक म्हणून प्रख्यात चित्रपट निर्माते - दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांची नियुक्ती झाली आहे. दरवर्षी गोव्यात भरणाऱ्या या महोत्सवाचं हे ५७ वं वर्ष आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या सोबतीनं महोत्सव आयोजनाची संधी मिळाल्याबद्दल गोवारीकर यांनी आनंद व्यक्त केला आहे.

**<><><><>**

पेट्रोलियम कंपन्यांनी व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची किंमत आजपासून तब्बल ९९३ रुपयांनी वाढवली आहे. त्यामुळे मुंबईत १९ किलो वजनाचं व्यावसायिक वापराचं सिलिंडर ३ हजार २४ रुपयांना मिळेल. एप्रिल महिन्यात या सिलिंडरची किंमत १९५ रुपये ५० पैशांनी, आणि मार्चमध्ये ११४ रुपये ५०

पैशांनी वाढवली होती. घरगुती वापराच्या एलपीजी सिलिंडरची किंमत ९१२ रुपये ५० पैशांवर कायम राहणार आहे. विमान इंधनाच्या किंमती पेट्रोलियम कंपन्यांनी ५ टक्क्यानं वाढवल्या आहेत.

**<><><><><>**

यंदाच्या मे महिन्यात, हिमालयाच्या पायथ्याकडचा प्रदेश, पूर्व किनारपट्टी, तसंच महाराष्ट्र आणि गुजरातच्या काही भागात सरासरीपेक्षा जास्त तीव्रतेची उष्णतेची लाट राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

हवामान विभागानं आज आपला मासिक अंदाज जारी केला. त्यानुसार, मे महिन्यात देशाच्या अनेक भागांत किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहील, तसंच वायव्य भारतात अनेक ठिकाणी, मध्य भारताचा काही भाग आणि लगतचा प्रदेश आणि ईशान्य भारताच्या दक्षिणेकडच्या भागात किमान तापमान सरासरीपेक्षा कमी राहील असा अंदाज आहे.

यंदाच्या मे महिन्यात देशाच्या बहुतांश भागांत सरासरी किंवा सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडेल, तर पूर्व आणि ईशान्य भारतात, तसंच पूर्व मध्य भारतात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल, असं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधल्या १५ मतदानकेंद्रांवर फेरमतदान घेण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत. यामध्ये मगरहाट पश्चिम मतदारसंघातील ११ आणि डायमंड हार्बरमधील ४ केंद्रांचा समावेश असून, उद्या सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत मतदान होणार आहे. निवडणूक निर्णय अधिकारी आणि निरिक्षकांनी दिलेल्या अहवालांच्या आधारे संबंधित मतदान प्रक्रिया रद्द करण्यात आली होती.

**<><><><><>**

डेन्मार्क मध्ये हॉर्सेन्स इथं थॉमस चषक बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारतानं चीन तैपेई विरोधातले पहिले दोन सामने जिंकले. लक्ष्य सेननं चोऊ टिएन चेनचा १८-२१, २२-२०, २१-१७ असा पराभव केला. त्यानंतर, सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं चिऊ शियांग चिएह आणि वांग ची-लिन यांचा २३-२१, १९-२१, २१-१२ असा पराभव करत आपली आघाडी कायम ठेवली.

एकेरीच्या दुसऱ्या सामन्यात आयुष शेट्टीचा सामना लिन चुन-यी बरोबर होईल. इतर सामन्यांमध्ये हरिहरन अमसकरुणन आणि एम.आर. अर्जुन यांचा सामना, लियू कुआंग हेंग आणि यांग पो-ह्सुआन यांच्याशी होईल, तर किदाम्बी श्रीकांत आणि ची यू जेन यांचा सामना होईल.

**<><><><>**

महाराष्ट्रसह देशभरात आज बुद्ध पोर्णिमा विविध कार्यक्रमांनी साजरी झाली.

नेपाळमध्येही सर्वत्र बुद्ध पोर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे. या निमित्तानं नेपाळमध्ये सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. भगवान बुद्धांचं जन्मस्थान असलेल्या लुंबिनीसह नमो बुद्धाय, स्वयंभूनाथ आणि बौधनाथ यांसारख्या प्रमुख स्तूपांच्या ठिकाणी भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली आहे. ठिकठिकाणी प्रार्थना, दीपोत्सव, दानधर्म आणि पांढऱ्या वस्त्रांमधील मिरवणुकांसारखे कार्यक्रम आयोजित केले आहेत.

काठमांडूसह इतर शहरांमध्येही विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह भगवान बुद्धांच्या शिकवणीवर आधारित परिसंवादांचंही आयोजन करण्यात आलं.

**<><><><>**

लंडन इथं सुरु असलेल्या जागतिक संघ टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत, भारताच्या पुरुष आणि महिला संघांनी दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. स्पर्धेच्या पहिल्या फेरीत दोन्ही संघांनी आपापल्या गटात अव्वल स्थान पटकावलं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज जयपूर इथल्या सवाई मानसिंग स्टेडिअमवर राजस्थान रॉयल्स आणि दिल्ली कॅपीटल्स यांच्यात सामना सुरु आहे. राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा राजस्थान रॉयलच्या ९ षटकात २ बाद ८५ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

राज्य शिक्षण मंडळानं या वर्षी फेब्रुवारी- मार्च महिन्यात घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल उद्या, २ मे रोजी ऑनलाईन जाहीर केला जाणार आहे. मंडळाचे सचिव दीपक माळी यांनी अधिकृत परिपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

//<><><><><>//